**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्रं. २९७७/२०२४</u>**
**<u>नि. १३ सोबत</u>**

**<u>आरोपीतर्फे वकील श्रीमती जैन यांचेतर्फे फिर्यादी यांचा उलटतपास शपथेवर सुरु-</u>**

८. मी सदर संस्थेमध्ये क्लार्क म्हणून असून माझे शिक्षण बी. कॉम. झालेले आहे. आमची संस्था नोंदणीकृत असल्याबाबत मी कागद हजर केलेला नाही. आमची संस्था सभासदांना कर्ज पूरविते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी सभासद असल्याबाबत मी कागद हजर केलेला नाही. मी माझे नियुक्तीपत्र हजर केलेले नाही. साक्षीदार सांगतो ठराव हजर केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, कर्ज प्रकरण करण्याकरीता त्या संस्थेचे सभासद असणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे आहे की, एखादी व्यक्ती सभासद आहे हे सभासद यादीवरून समजते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी सभासद आहे की नाही हे सभासद यादी पाहिल्यावर लक्षात येईल. कर्जासंबंधी संपूर्ण कागदपत्रे पाहिल्यानंतरच कर्ज मंजूर आहे की नाही ते समजते. हे म्हणणे खरे नाही की, मी मूळ ठराव हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही आरोपीस अॅड. इंद्रजित चव्हाण यांच्यामार्फत (नि.क्र. १६) नोटीस पाठविलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. १३/०८/२०२४ रोजी आरोपीस आमच्या संस्थेमार्फत नोटीस पाठविलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. १६ वरील नोटीस ही झेरॉक्स प्रत आहे. आम्हाला स्थळ प्रत दाखल करण्यास हरकत नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, नोटीसवर माझी सही नाही. साक्षीदार सांगतो वकीलांची आहे. अॅड. इंद्रजित चव्हाण यांनी पॅनलवर नियुक्ती असलेबाबत मी कागद हजर केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, नोटीसमधील मजकूर मी किंवा संस्थेतील संबंधीत यांनी सांगितला असे नोटीसमध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, कर्जप्रकरणावर संचालक मंडळाची सही झाल्यावर कर्ज मंजूर होते. संस्थेचा बायलॉज मी हजर करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेल्या खातेउताऱ्यामधील रक्कम व चेकच्या रक्कमेमध्ये तफावत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादातीत धनादेशावर आरोपीचे हस्ताक्षर नसून मजकूर आरोपीने लिहिलेला नाही, तसेच त्यावर आरोपीची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा फिर्यादीस कोणतेही

कायदेशीर देणे लागत नाही. मी ठरावा संबंधी प्रोसिडींग बुक हजर करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तरी स्विकृत.

ARCHANA MANOJ GAIKWAD

Digitally signed by ARCHANA MANOJ GAIKWAD
Date: 2026.06.12 14:53:55 +0530

**इचलकरंजी.**
**दि.१२/०६/२०२६.**

**( ए. एम. गायकवाड)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्रं.३**
**इचलकरंजी, जि. कोल्हापूर**